# प्रभुतरुण

| वर्ष ५१ | अंक ०३ | मुंबई | सप्टेंबर, २०१७ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**



*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**


*संपादकीय*

## फ्रेण्डशिप डे!

—सुहासिनी कीर्तिकर

**कृतज्ञ स्मरण**



**श्री. सुहास विष्णुपंत कोठारे**

कथेचं नाव नक्की आठवत नाही. (वय झालं ना!) पण हिंदी अभ्यासक्रमात एक गोष्ट होती आम्हाला. खानदानी, श्रीमंत घराण्याची. एके काळी अवघी मुंबई पाठारे प्रभूंची होती म्हणतात. पण हलके हलके फक्त काही घरेच आपल्या घराण्याचे नाव राखत मुंबईत खऱ्या अर्थाने पाय रोवून राहिली. बाकीचे काय? 'पक्षी जाय दिगंतरा....!' तस्संच या श्रीमंत, खानदानी घराण्याचेही झाले. बापजादे गेले, त्यांनी कमवून ठेवलेले नंतरची पिढी ऐषारामात जगून संपवू लागली. वर परत घराण्याची इज्जत जपण्याचा खोटा आव. त्यामुळे ''आमच्या बापजाद्यांनी पुढच्या अनेक पिढ्यांसाठी कमवून ठेवलंय. आम्हाला पैशांकरिता काम करायची काय गरज?'' - अशा गमजा. मग काय? ''विधाताही न शके ते टाळावया' या न्यायाने बापजाद्यांची पुंजी संपली. बडा घर, पोकळ वासा उरला. पण चालू पिढीत 'थेंबे थेंबे' तळे साचवणारा कुणीच नाही. आव मात्र सगळा खानदानी घराणेशाहीचा. अशातच एके दिवशी त्या घरात एक पाहुणा आला. एकेकाळी आधीच्या पिढीने याला मार्गाला लावलेले म्हणून कृतज्ञ असणारा. या घराचा जसा मित्रच. आता पाहुणा आला म्हणताना त्याची बडदास्त ठेवायला हवी. कर्ती माणसं तर गाद्यागिरद्यांवर लोळत याच्याशी बड्या बड्या बाता मारणारी. घरची मालकीण बिचारी! तिने ही सरबराई करण्यासाठी एक नेहमीचाच उपाय केला. विश्वासातल्या नोकराला बोलावले. परसदारी आपल्या हिरव्या शेंगा झुलवत बारीक इवल्या पानांचे वैभव मिरवणारा शेवगा होता. त्याच्या शेंगा त्या नोकराने बाजारात विकल्या. चार पैसे मालकिणीच्या हवाली केले. त्याच पैशातून पाहुण्याचा यथासांग पाहुणचार झाला. पाहुणा हे सगळे कुणाला नकळत पहात होता. घरात जेवायला चांदीची ताटं असत. आता त्याची मारामार. पाहुण्याला नीटच कळलं की आब राखण्यासाठी ही सगळी चांदी विकली गेली आहे. पण घरातला एकही कर्ता काम करून 'कमाईचे सोने' खायला राजी नाही. एकालाही सुबुद्धी होऊ नये? पाहुण्याला वाईट वाटले. ''अरे! एकेकाळचे समृद्ध घर नुसते ऐदी बनले आहे! हा कसला घरंदाजपणा?'' दुसऱ्या दिवशी हा पाहुणा जाणार होता. त्याने काय करावे? पहाटेच्या अंधारातच उठून त्याने शेवग्याचे झाड खच्ची केले अन् निघून गेला.

सकाळी जेव्हा घरादाराला हे कळले तेव्हा अवघे घर सटपटले. आता खायचे काय? विकून पैसे कमवायला तर आता शेंगाही नाहीत. करायचे काय? शेवटी त्या घरातल्या धाकट्याला उपरती झाली. तो कामधंद्याला लागला. मग हलके हलके नियमित येणाऱ्या उत्पन्नाने घर सावरले. पुढे एकेकाचा ऐदीपणा जाऊन शेवग्यासारखेच ते घर निरोगी चैतन्याने सळसळू लागले. बहरू लागले. अशीच काही वर्षे गेली. अचानक तोच पाहुणा दत्त म्हणून हजर झाला. त्याने पाहिले - प्रत्येकजण आपापले उद्योग करतोय. घरची लक्ष्मी आंतरिक आनंदाने फुलून गेली आहे. घराला गतकाळाच्या जोडीने वर्तमानकाळही भोगता येतोय.

मग तो पाहुणा अत्यंत समाधानाने म्हणाला, 'माफ करा मित्रांनो, मी जर तेव्हा दारचा शेवगा तोडला नसता तर आजचं हे निरोगी घरंदाजपण दिसलं नसतं.'' तेव्हा त्याचा हात स्नेहभराने दाबत घराचा यजमान म्हणाला, ''खरंय्. तुमच्या कृतीने वाईट वाटलं आम्हाला. रागही आला. पण तुम्हीच आमचे सच्चे दोस्त! घरंदाजपणाच्या खोट्या कल्पनेपासून दूर केलंत आम्हाला.''

मित्रहो, खरा मित्र कधी कधी शत्रू वाटतो आपल्याला. पण 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' असताना असे 'दोर कापणारे' मित्रच हवे असतात. नुकताच (म्हणजे गेल्या महिन्यात;) 'मैत्रीदिन' आपण साजरा केला. अरे! हो; हो; मैत्रीदिन नव्हे; 'फ्रेण्डशिप डे'! आपण मेंढरं बनून ('शीप'बनून) केवळ चालीरिती, संस्कारच नव्हे; तर आपली शब्दकळाही बदलली आहे. फ्रेण्डला जास्तीत जास्त रिबीनींची चिन्हे बांधायची. मनगटाला गंडे बांधून गंडवायचं. अंगठ्या काय, गळपट्टे काय, इथे तिथे गोंदवून घेणं काय, हल्लागुल्ला काय... काही विचारू नका. मग एखादा 'शो' 'मारणं'! पावसाळी सहल करणं, उन्मादात 'फ्रेण्ड'सह स्वत:ला झोकून देणं... हल्ली सर्रास अन् 'सैराट' सुरू आहे. अशावेळी वर सांगितलेल्या गोष्टीतला एखादा छुपा मित्र आहे का आपल्याला?... शोध घ्यायला हवा. तो नसतो तेव्हा मग 'बेधुंद मनांच्या' वारूवर स्वार झालेले दोन मित्र दारूच्या बाटल्या हातात घेऊन अवघड कड्यावर चढतात, त्यांचा कडेलोट कधी होतो, कळतच नाही त्यांना. 'ए, ए, ए,' करत त्यांना हाकारणाऱ्या मित्रांमधल्या कुणी एकाने का नाही त्यांना अडवलं? ते पुढं जाऊ लागताच त्यांच्या थोबाडीत मारून का नाही त्यांची नशा खाडकन् उतरवली? कारण उघड आहे. सुरुवातीच्या गोष्टीत येणारा शत्रूरूप मित्र त्या कंपूतील कुणालाच व्हायचं नसतं. करायची ती फक्त मजा!

असे अनेक प्रसंग असतात, घडतात मित्रांनो. अशावेळी मैत्र 'शत्रुवत्' पाळणं गरजेचंच असतं. आपला एखादा मित्र व्यसनांच्या आहारी जातो. ते त्याचं वहावत जाणं आपण थांबवायला हवं. पण काय करतो आपण? त्यानं गळ घातली, अजिजीनं विनवलं की मित्र म्हणून त्याला 'हे शेवटचेच हं.' म्हणत कधीही परत न येणारे उसने पैसे देतो. त्याच्या (कधी कधी 'तिच्या' ही!) घरच्यांना काही सुगावा लागलेला असतो. घरात चिडचीड करणं, कधी काहीच न खाणं तर; कधी 'खा खा' सुटल्यासारखं खात सुटणं, घुमेपणानं वावरणं, रात्री अभ्यासाला जातो म्हणून सतत बाहेर असणं, कशाकशासाठी म्हणून पैसे मागणं, कधी कधी त्यावरून आक्रस्ताळेपणा करणं... अशा विसंगत वागण्यातून आईच्या, वडिलांच्या मनात संशयाची पाल चुकचुकलेली असते. अशावेळी क्षीण आधार म्हणून त्यांनी तुमच्याकडे तो सल बोलूनही दाखवलेला असतो. खऱ्याच मैत्रीला जागायचं तर त्यांनी विचारण्याआधी मित्र म्हणून त्याच्या पालकांना आपणहूनच सगळं सांगायला हवं असतं. पण त्यांनी विचारल्यावर आपण थातुरमातुर सारवासारव करतो. 'नाही हो काकू, तो खरंच माझ्याकडे अभ्यासाला होता.' धादान्त खोटं! 'खरंच काका, 'प्रॅक्टिकलसाठी' ते हे आणायचं होतं, म्हणून त्यानं घेतले असतील पैसे...' निव्वळ ढोंग! अशी सारवासारव करून, ढोंग करून तुम्हाला वाटतं आपण मित्राला वाचवतोय. पण सुरुवातीच्या कथेतील मित्राचं शत्रूसारखं वागणं... ते चुकीचंच का? अशावेळी तुम्ही मित्राला खिंडीत गाठून त्याच्या पालकांचं बोट धरलं असतंत तर; तुमचा मित्र व्यसनांच्या दरीत खोल खोल जात राहिला नसता कदाचित. हा आपला मित्र


(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

आपल्याला सावरून घेतोय असा भरवसा वाटला की बेलगाम वागणं चेकाळतंच मग. रस्त्यावर भिकाऱ्यासारखं मरणं, दरडीवरून कोसळणं, तुरुंगाची हवा खाणं वा घरच्यांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन त्यांच्या डोक्यावर बसत स्वत:च्या आयुष्याची वाताहत करणं... एवढंच उरतं बाकी. मग वेळीच सावध करायला हवं होतं ना मैत्रीच्या बंधातून. 'पुत्र मित्रवदाचरेत्!' प्रमाणं 'मित्र शत्रूवदाचरेत्!' ही खरंच आहे. जे नातेवाईक करू शकत नाहीत, ते असा सच्चा मित्र शत्रूवत् बनून करू शकतो.

अरे! मी गोष्टीचा आधार घेऊन मित्र शत्रू, शत्रू मित्रच करत बसलेय. प्रत्येक वेळी तसंच असतं असं नाही हं! मैत्री तर अनेक प्रकारची असते. नवराबायकोमधली 'देहस्वी'पणा पलिकडची भावपूर्ण मैत्री असते. काहीही झालं तरी त्याचा /तिचा आधार असणारच हा भरवसा असतो. मैत्री म्हणजे समजून घेणं. आधार देणं. प्रेम करणं. प्रसंगी चुकांना माफ करणं. मुख्य म्हणजे मैत्री म्हणजे सुंदर जगणं. समाधानी असतो आपण मैत्रीमुळे. सुखी होतो आपण मैत्रीमुळे. आपलं अनोखं नातं म्हणजेच शुद्ध मैत्री. पेसी मूरचं एक गाजलेलं चित्र आहे. दोन खुर्च्यांत बसलेले म्हाताराम्हातारी. समोर टेबलावर वाफाळलेले चहाचे कप. अतिशय प्रसन्न अशा दोघांच्याही सुरकुतलेल्या चेहऱ्यांवर असीम समाधान. बस. एवढंच. त्या चित्राचं शीर्षक आहे- 'द लव्ह'. हे खरं मैत्र!

ही अशी जगणं समृद्ध करणारी सुंदर मैत्री माणूस आणि जनावरं यांच्यातही असते. शिवाजी महाराज गेल्यानंतर त्यांच्या समाधीपाशी बसून मूक रूदन करणारा त्यांचा कुत्रा शेवटी तिथेच गतप्राण झाला. आज आपल्याला त्याचीही समाधी पहाता येते. मैत्रीचे अमर स्मारक! वर्ध्याला स्वत:चे 'मॅटरनिटी होम' असणारी माझी मावशी मुंबईत गेली. तिचा 'बहादूर' नावाचा कुत्रा होता. तिथे दूर त्याने अन्नपाणी सोडले. शेवटी गेला तो. हे खरे 'जीवाचे मैत्र'. परवाच एक बातमी वाचली. वाघाचा एक बछडा 'बिखर गया था!' त्याला खूप वर्षे होऊन गेल्यावर म्हणजे जवळ जवळ आठ वर्षांनी तो हुडकत हुडकत आपल्या जागी परत आला. त्याच्या गळ्यातील बिल्ल्यामुळे हे सिद्ध झाले. हे केवळ आईसाठी शोधसत्र नव्हते; त्या जागेशी - त्या जंगलाशी त्याची मैत्री होती म्हणून हे घडले.

जागेशी मैत्री तर आपलीही असतेच ना! शाळेला घेऊन जाणारी किलबिलणारी वाट आंबटगोड आठवणींनी आपल्या मनात सदैव मैत्र जागवते. ऐन भरात बेभान होऊन बागेत मारलेल्या गप्पा, समुद्रकाठी अनुभवलेले उधाण, ग्रंथालयातील वाचन समाधी, मित्र मैत्रिणींबरोबर चढलेले डोंगर... हे आपले जीवाभावाचे मित्रच असतात. कायमचे. जागेचं साहचर्य स्वत:च्या घराशीही मैत्र जोडत असतं. स्वयंपाकघरातील दरवळणाऱ्या स्वादाबरोबर रंगलेली तल्लीनता धुंद करणाऱ्या गाण्यापेक्षा कुठेही कमी नसते. अशावेळी ती 'चुलतसासूबाई' (-चूलबाई!) नसते. ती असते जीवाभावाची मैत्रीण. आपल्या खोलीतल्या खिडकीने दारे उघडी ठेवून आपली कितीतरी मनोगते ऐकलेली असतात. मैत्री जपलेली असते. नवथर अवस्थेत 'येणार साजण माझा' सांगणारा घड्याळाचा ठोकाही मित्र बनून काळजाचा ठोका चुकवीत असतो. अन् घरातील इतर माणसे? आपण मैत्रीभाव जागवला तर तीही मैत्रीशी जागतात. मग आजीआजोबा आणि नातवंडं यांचं वेगळ्या जगातलं अनाम मैत्र अनुभवास येतं. वयात आलेल्या मुलीचं अन् आईचं 'ती सुंदर दुसरी दुनिया' बघणारं मैत्र तयार होतं. 'तुझ्या गळा माझ्या गळा' करत भाऊबहीण मैत्री जोडतात ती अनोखीच असते.

अनाम मैत्र खरं तर स्वत:चंच स्वत:शी असतं. शब्दांच्या पलीकडलं. आपणच आपल्याला ओळखलं तर 'आपुलाचि आपल्याशी संवाद' सुरू होतो. 'मी'चा शोध घेणारा. 'अहं'ला 'वयम्' मध्ये बदलणारा. प्रकृती आणि आत्मा एकाकार करणारा. हे मैत्र म्हणजे आनंदाचे डोही आनंद तरंगच. अशावेळी आपलं 'स्व'त्व सुरुवातीच्या गोष्टीतला मित्रभाव जपत आपल्याला कधी फटकारतं, कधी चुचकारतं, कधी एकाकार करतं. त्याला 'तुळणा' नाही!

तर मित्रहो; गेल्या महिन्यात साजरा झालेला मैत्रीदिन आपल्या तुपल्यात, रोजच, नेहमीच साजरा होवो! शब्दांसह 'संवादु' साधत राहो! 'हॅपी फ्रेण्डशिप डे!'

# टिळक- एक समाजसुधारक

-सौ. स्मिता आशिष देसाई

*('ऑगस्ट' म्हणजे धार्मिक सणवारांचा महिना. तो राष्ट्रीय सणवारांचाही आहे. क्रांतीदिन, स्वातंत्र्यदिन आदी. १ ऑगस्टपासून त्याची सुरुवात होते. त्या १ ऑगस्टचा संदर्भ जागवत टिळकांबद्दल सौ. स्मिता देसाई यांचा हा लेख.*

*-संपादक)*

नमस्कार! मित्रांनो, आज मी लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त (१ ऑगस्ट) या असामान्य व्यक्तीविषयी चार शब्द लिहिण्याचे धाडस करत आहे.

लोकमान्य टिळक यांचे संपूर्ण नाव बाळ गंगाधर टिळक. त्यांचे मूळ नाव केशव असे होते. पण त्यांना 'बाळ' या टोपण नावानेच सगळे ओळखत. या 'बाळा'ची कुशल बुद्धिमत्ता पाहून त्यांचे गुरू त्यांना 'सूर्याचे पिल्लू' म्हणत.

टिळकांचा जन्म रत्नागिरीमध्ये तर; शिक्षण पुण्यात झाले. ते अत्यंत हुशार विद्यार्थी होते. गणितात त्यांना विशेष प्राविण्य मिळत असे. लहानपणापासूनच त्यांना अन्यायाबद्दल चीड होती. ते शाळेत असतानाची एक घटना - शेंगांच्या टरफलाची गोष्ट अतिशय प्रसिद्ध आहे. बाणेदारपणे दिलेले उत्तर 'मी कचरा केला नाही आणि म्हणून तुम्ही मला मारू शकत नाही.' या गोष्टीतून आजही टिळक आपल्याला महत्त्वाची शिकवण देतात आणि नकळत आपणा सर्वांना कर्तव्याची आठवण करून देतात.

समाजपरिवर्तन शिक्षणाशिवाय अशक्य आहे. या विचाराने त्यांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांना 'न्यू इंग्लिश स्कूलची' स्थापना करण्यास मदत केली. शालेय शिक्षण जितके स्वस्त करता येईल आणि तेही शिक्षणाचा दर्जा ढासळू न देता, याची त्यांनी काळजी घेतली. हे स्कूल तात्काळ प्रसिद्ध झाले. हे कार्य सातत्याने चालू राहावे म्हणून 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' या नावाची सार्वजनिक संस्था त्यांनी उभारली.

याच काळात म्हणजे १८९६-९७ मध्ये भारतीयांना दोन भयंकर आपत्तींना तोंड द्यावे लागले. दुष्काळ आणि प्लेगची साथ. यावेळी टिळकांनी शेतकऱ्यांना संघटित होण्याचे आवाहन केले. त्यांच्या हक्कांबद्दल त्यांना जागरूक केले. 'केसरी' वृत्तपत्राद्वारे सरकारला त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली. ब्रिटिश सरकार 'दुष्काळ विमा निधी' अंतर्गत लोकांकडून पैसा गोळा करत असे. त्याचा वापर लोकांसाठी करण्यात यावा; असे त्यांनी सरकारला ठणकावून सांगितले. दुष्काळानंतरही सक्तीची करवसूली कशी चुकीची आहे, हे त्यांनी पटवून दिले. याबरोबरच धनिक व दुकानदारांना अन्न आणि पैसा दान करण्याचे टिळकांनी आवाहन केले व यातून अनेक ठिकाणी सार्वजनिक खानावळी चालवल्या.

इंग्रजांचे अंधानुकरण करणाऱ्या भारतीयांबद्दल टिळकांना अत्यंत चीड होती. त्यांच्या मते भारतीयांच्या दुर्बलतेची कारणे त्यांचा हरवलेला आत्मविश्वास आणि एकीची भावना ही होती. जोपर्यंत लोकांचा त्यांच्या धर्म, संस्कृती आणि इतिहासाबद्दलचा आदर परत वाढत नाही तोपर्यंत राजकीय आणि सामाजिक स्वातंत्र्याच्या गप्पा मारणे व्यर्थ आहे. त्यांच्या ग्रीक संस्कृतीच्या अभ्यासातून त्यांना असे जाणवले की, ज्युपिटर देवाच्या स्मरणार्थ दर चार वर्षांनी साजरे होणारे ऑलिंपिक खेळ विविध ग्रीक राज्यांना एकत्र आणण्यात यशस्वी ठरले. याच धर्तीवर १८९३ मध्ये त्यांनी गणेशोत्सवाचे नव्या स्वरूपात पुनरुज्जीवन केले. हिंदूंमध्ये घराघरात गणेशोत्सव साजरा केला जात असे. पण टिळकांनी त्याला एका दहा दिवस चालणाऱ्या सामाजिक महोत्सवाचे स्वरूप दिले. यामागचे त्यांचे दोन उद्देश म्हणजे एक या उत्सवाने ब्रिटिशविरोधी मतप्रचारांसाठी एक व्यासपीठ मिळावे आणि दुसरे म्हणजे याद्वारे हिंदू समाज जवळ येऊन त्यांच्यात एकोपा वाढावा. अशा रितीने धार्मिक पातळीवर लोकांना यशस्वीरित्या एकत्र आणून त्यांना एक व्यासपीठ मिळवून दिले. नाहीतर इंग्रजांचा राजकीय बैठकींना असलेला विरोध- चार लोकांना एकत्र येऊ देत नव्हता. शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे आदर्श होते. या कारणांनी त्यांनी शिवजयंतीची सुरुवात केली.

टिळकांनी 'केसरी'मधील 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?', 'उजाडले पण सूर्य कुठे आहे?, 'हे आमचे गुरूच नव्हेत', या आणि अशा जळजळीत अग्रलेखांमधून अलिप्त भारतीय समाजाला भोवताली घडणाऱ्या घटनांचे भान आणून दिले.

असे होते लोकमान्य टिळक. एक असामान्य व्यक्तीमत्व, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. आणि तो मी मिळवणारच' या वक्तव्याने अनेक पिढ्यांना प्रेरणा दिली आणि पुढेही मिळत राहील. आज आपल्या भोवताली - समाजात - भ्रष्टाचार, अन्याय, स्वार्थीपणा या समाज कंटकांचा सहज चाललेला वावर पाहिला की देवाला विनवावेसे वाटते- 'लोकमान्य टिळक- यांच्यासारख्या समाजसुधारकांची आम्हाला अत्यंत गरज आहे. देवा, शिवजयंती असो की गणेशोत्सव. त्यांचे बदललेले रूप खरंच सुखावह नाही.' आज आपण सर्वांनी टिळकांनी दिलेली शिकवण परत अमलात आणण्यासाठी कणखरपणे त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजाचे रूप बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

*

कथाकली

# उंबरठा

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

''म्हणता म्हणता नवीन जागेत कायमच राहायला जायचा दिवस जवळ आला'' - निर्मलाबाई वसंतरावांना म्हणाल्या.

''हो ना! मधला काळ किती पटकन गेला'' - वसंतरावांनी निर्मलाबाईंना दुजोरा दिला.

''खरं तर मधल्या काळाची आपल्याला जाणीवच झाली नाही. कारण अविनाशनं नवीन जागेत सोयी सुविधा करून घेण्याची तयारी कधीच सुरू केली होती..''

''निर्मला, कशी वाटली तुला नवीन घराची सजावट?...''

''छान आहे'' - निर्मलाबाई मुळमुळीतपणे उत्तरल्या नी पुढे म्हणाल्या - ''अनितानं आवडीनं सजवलाय तो फ्लॅट...!''

''नाराज दिसतेयस... का गं?... तुझ्या सूचनांना तिथं वाव नाही म्हणून की काय?'' - वसंतरावांनी निर्मलाबाईंच्या मनातले विचार अचूक ओळखले...

''हंऽऽ आपल्या सूचना कशा काय विचारात घेतल्या जाणार हो तिथं? ते घर त्याचं... खरं तर सुनेचंच'' - निर्मलाबाई सुस्कारा टाकीत म्हणाल्या, ''नवीन घर सजवायची हौस असते बायकांना....''

''मी तुला हे सुख कधी देऊ शकलो नाही निर्मला'' वसंतराव खिन्नपणे म्हणाले, ''पूर्वी वाटायचं की कधीतरी आपण आपल्या मालकीच्या जागेत राहायला जाऊ, ती जागा मनासारखी सजवू, तुला तुझी सगळी हौसमौज तिथं पुरवता येईल. पण हे कधी जमलंच नाही गं... मनातल्या इच्छा रुजल्या, फोफावल्या नी कालांतरानं परिस्थितीचं खतपाणी न मिळाल्यानं सुकूनही गेल्या...''

''अगदी माझ्या मनातलंच बोललात...'' निर्मलाबाईंच्या मनात आलं... आपल्यालाही पुष्कळदा वाटायचं की, घराला झुळझुळीत पडदे हवेत. घरात येणारा वारा, सुंदर उजेड, त्या पडद्यांशी खेळत वारा घरात यावा, सगळीकडे नव्या वस्तूंचा चकचकाट असावा, स्वयंपाकघरात मला हव्या त्या सोयी मी एखाद्या राजाच्या राणीनं गाजवावा तशा अधिकारात करून घ्याव्यात आणि फक्त माझंच राज्य असावं, हवं ते करता यावं... पण छे! तसं कधीच घडलं नाही... माझ्या मनातली स्वप्नं फक्त स्वप्नंच राहिली... निर्मलाबाईंच्या मनातल्या विचारांचा जणू पडसाद उमटावा तसे वसंतराव म्हणाले, - ''तुझी स्वप्नंही फक्त स्वप्नंच राहिली असतील नं निर्मला? ... पण तू कधीही स्वप्नंही सांगितली नाहीस किंवा ती पुरी न झाल्याबद्दल थयथयाटसुद्धा केला नाहीस. खरं तर तू माझ्यावर रागवायला हवंस. पण कधी रागावलीही नाहीस...''

''कशाला रागवायचं? अहो, आपली परिस्थिती कळत नव्हती का मला? तुमच्या हातात असतं तर तुम्ही मला राणीचा, छोटा का होईना, पण राजवाडा दिलाच असतात याची मला खात्री होती. तेव्हाही होती आणि आताही आहे. खरं तर आपली जागा विकून तुम्हीच अविनाशला ह्या फ्लॅटसाठी पैसे दिलेयत नं? म्हणजे आत्ता मला तो राजवाडा तुम्हीच दिलायत.''

''मी खरंच खूप नशीबवान आहे. तुझ्यासारखी समजूतदार बायको मला मिळाली हे माझं खरंच खूप मोठं भाग्य आहे. पण त्या राजवाड्याची सम्राज्ञी वेगळीच आहे गं...''

''अं हं! मी राजमाता आहे. आपला अविनाश प्रेमळ आहे. आपल्याला तो कधी अंतर तर देणारच नाही, उलट आपली खूप बडदास्त ठेवेल. काळजी घेईल याची खात्री आहे मला.''

''आणि मी?...'' एवढा वेळ बाहेर त्याचं बोलणं ऐकत असलेल्या अनितानं खोलीत येत विचारलं.. ''मी तुम्हाला कशी वागवेन असं वाटतंय?''

''तू सुद्धा चांगलीच आहेस गं. म्हणून तर विश्वासानं आम्ही आम्हाला तुझ्या हाती सोपवतोय नं?'' - निर्मलाबाईंनी उत्तरादाखल प्रतिप्रश्न केला - ''अगं, सामान कधी हलवायचं, बांधायचं कसं नी हलवायचं कसं ते ठरवलंस का?''

'त्याची काळजी करू नका. हल्ली अशी माणसं असतात की जी आपल्याला सामान बांधायला नी हलवायला मदत करतात. पुढच्या शनिवार, रविवारी सामान हलवूया म्हणजे आम्हाला जास्त रजा घेण्याची गरज उरणार नाही. तेच लोक बॉक्सेस देतात. त्यातच भरू.''

''पण तिकडे ते सगळं उपसून कपाटामध्ये लावायचं, फर्निचर लावायचं, पलंग लावायचा हे सगळं त्रासदायक ठरेल नाही?''

''अं हं! तेच लोक मदत करतील. जास्त सामान आहेच कुठं? आजच कपाट आवरायला घ्या. जुनं सगळं भंगारवाल्याला देऊन टाका. उगीच नवीन घरात सामानाची गर्दी कशाला?''

''काडी काडी जमवून उभारलंय हे संसारचं घरटं. त्यातल्या मायेच्या कापसाची हेळसांड कशी करणार?'' निर्मलाबाईंना कोणतीही वस्तू टाकायची कल्पनाही कशीशीच वाटली.

''तुमचे कपडे ठेवायला तिकडे स्वतंत्र वॉर्डरोब बनवलाय. ओट्याच्या कपाटात भांडीकुंडी राहतील. पलंग, खुर्च्या, तिकडे तुमच्या खोलीत राहतील.'' - अनितानं सगळंच ठरवून टाकलं होतं.

......घराचं सोडाच. पण आमच्या खोलीत काय ठेवायचं हेसुद्धा तिनंच ठरवलंय... निर्मलाबाईंचं मन सुस्कारे सोडत होतं. लग्न झाल्यावर सासूसासऱ्यांच्या आवडीनुसार, सोयीनुसार घर होतं. आत्ता आत्तापर्यंत ते होते. तोपर्यंत स्वत:च्याही काही इच्छा असतात, आवडीनिवडी असतात हेच आपण विसरून गेलो आणि घरातली आपली गैरसोयच आपली सवय नी पुढे तीच सर्वोत्तम सोय बनली. माणसाचं मन इतकं सवयीच्या आधीन होतं की सवय माणसाचं मन मोडून टाकते? सोय गैरसोय हे फक्त मनाचे चोचले की मनाच्या चोचल्यांना गरजेनुसार नी परिस्थितीनुसार सोय किंवा गैरसोय म्हणण्याची सवय होते? पूर्वी सासूचा संसार आपला संसार मानला. आता सुनेचा संसार आपला मानायचा.

सासूबाई म्हणायच्या - ''इतकी वर्ष संसार केलास पण प्रत्येक गोष्ट मलाच बघावी लागते...''

म्हणजे...? तो संसार माझा होता... खरंच? फक्त म्हणायला माझा संसार. संसार म्हणजे तरी नेमकं काय? सासू सासरे, नवरा, मुलगा? की घर आणि घरकाम? की घरातलं सामान? की या सगळ्यांशी निगडीत आपल्या आवडीनिवडी, आशा-आकांक्षा नी अपेक्षा? नी हे धड काहीच मिळालं नाही तर फक्त उपेक्षा? आता सुनेचा संसार - तिथं माझं काही नाही. सगळंच तिचं. घर, सामान, आशा, आकांक्षा, अपेक्षा, स्वप्नं, नवरा, मुलगा नी सासूसासरेसुद्धा तिचेच म्हणजे तिच्याच तालावर हलणारे डोलणारे नी नाचणारेसुद्धा. निर्मलाताईंचं मन आज इतक्या वर्षांनी एकदम निराश, वैफल्यग्रस्त झालं. सगळ्याच गोष्टींमधला, विचारांमधला, नव्या जागेत राहण्याच्या कल्पनेमधला उरला सुरला उत्साह संपला नी भानावर आली तेव्हा अनिता विचारीत होती ''आई किती वाजता निघायचं? जेवणाचं काय करायचं? टेम्पो किती वाजता मागवू?''

''मला गं त्यातलं काय कळतंय? तुम्हाला ठीक वाटेल तसं करा.'' निर्मलाबाईंच्या आवाजातला निरुत्साह अनिता नी वसंतराव दोघांनाही प्रकर्षानं जाणवला.

वसंतराव म्हणाले - 'अगं, निघण्याच्या अगोदरचे चार दिवस सगळ्यांनी बुक केलेयत. सकाळचा चहा, दुपारचा चहा नाश्ता, निघण्याच्या दिवशी करायचा नाही ही सक्त ताकीदही दिलीय.''

''खरंच, या सगळ्या शेजाऱ्यांचं प्रेम, सहवास सोडून जाताना खूप जड जाणार आहे हं आपल्याला.''

''अगं, काही मिळवण्यासाठी काही गमवावंच लागतं. हा निसर्ग नियमच आहे. दिवस संपतो तो रात्रीची चाहूल देऊन आणि दिवस उजाडतो तेव्हा रात्र जाते संपून...' वसंतराव म्हणाले.

- - - - - - - - - - - - - -

इतक्या वर्षांनी आज आत्ताही

(पान ५ कॉलम ३ वर)

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# एक अविस्मरणीय अनुभव

-मीनाक्षी देसाई

एक शांत सुखी समृद्ध परिवार, त्यात साजरा होणारा एक सोहळा. एरवी नानीनिवासच्या प्रांगणातच साजरा होणारा. परंतु वर्षाऋतुत आपल्या इच्छेप्रमाणे हा सोहळा आकाशातूनच पाहत आशीर्वाद देण्याचे आवाहन मेघांना करण्याची शक्ती आम्हांपैकी कोणातच नसल्यामुळे बंदिस्त छताचा आश्रय घ्यावाच लागला. म्हणून एव्हियन हॉटेलच्या, समारंभाला उठाव देऊ शकेल अशा एका छोटेखानी हॉलमध्ये हा सोहळा साजरा झाला.

हॉलमध्ये पाऊल ठेवले. पण अहो आश्चर्यम्! पोहोचलो एका कमलपुष्पांनी सजलेल्या रम्य तळ्याकाठी. वन्य परिसरही आकर्षकच होता आणि लक्ष गेले कमलासनाकडे. अहो; लक्ष्मीदेवी येणार की काय? तेवढ्यात सौ. बागआत्यांनी केलेल्या एक कोंबडीबाई आपल्या पिलावळीला समाधानाने सांभाळीत पण आज आपल्या या शांत परिसरात कसली गडबड चालली आहे; या गहन विचारात गढून कुतुहलाने या समस्येचा शोध घेत बसलेल्या दिसल्या. आणि; आणि अहो... एका हातात कमलपुष्प व दुसऱ्या हातात मंगल धनकलश घेऊन साक्षात लक्ष्मीदेवी अवतीर्ण झाल्या, आपल्या आसनावर विराजमान झाल्या. समयानुरूप आपल्या मंगल कलशातून प्रसन्न सस्मित मुखाने धनवर्षा करून बालगोपालांना आनंदित केले.

ह्या लक्ष्मीदेवी चि. निषादची अर्धांगी, बंसी व डॉ. सुरेखाची मोठी सून नक्की न की, ज्येष्ठ कन्या सौ. देवश्री होती. उद्योजक बंसीधर धुरंधर, कृत्रिम अवयव निर्मितीसंस्थेचे सहायक, आधारस्तंभ धुरंधरसाहेब, यशस्वी रोटेरियन, जगभरच्या रोटरी जगातले मार्गदर्शक व्यक्तित्व, तसेच अनेकानेक पुरस्कार प्राप्त डॉ. सौ. सुरेखाचे घरगुती आत्मीयतेचे आतिथ्यशील रूप तिकडे साकारले होते. असे हौशी, उत्साही, कल्पक आणि वत्सल सासू सासरे सर्वच सुनांना लाभतात असे नाही.

या धुरंधर घराला कलादेवीचे वरदानच प्राप्त आहे. प्रत्येकात कला आपल्या नवनवीन अविष्काराने नांदते. तर इथेही तळे, कमळे कमलासन वगैरे नेपथ्यात चित्रकला, रांगोळीकला यांचा परिपाकच दिसून आला. नक्कीच ह्या रम्य आसमंतात लक्ष्मीदेवी विशेष प्रसन्न झाल्या असतील.

रंजनकाकांनी प्रास्ताविक करून प्रत्येक कार्यक्रमाचा संक्षिप्त उल्लेख करत सूत्रसंचालन केले. बाग आत्याने (सौ. बागेश्री परीख) लक्ष्मी स्तोत्रातले श्लोक गाऊन समारंभाचा श्रीगणेश केला. त्यानंतर सौ. देवश्रीच्या बहिणी, मैत्रिणींनी प्रसंगाला साजेशी गाणी गाऊन वातावरण निर्माण केले. या सर्वांचे निमित्त होते देवश्रीचे डोहाळे जेवण. देवश्रीला आज मुहूर्त होता. फुलं-वाडी-लक्ष्मीची वाडी होती.

सौ. सुरेखाला तिची धाकटी सून सौ. काजल सर्व कामात तत्परतेने मदत करत होती. पाय पोळवून झाले. देवश्रीला आजच्या साडीला शोभेशी गळ्यातलं, कानातलं यांची भेट मिळाली. आरती झाली आणि तो गमतीचा क्षण आला. देवश्रीच्या ताटात प्रथेनुसार दोन लाडू ठेवण्यात आले. आणि हे दोन मोठे मोदक बनवले कुणी तर; निषादच्या मामीच्या आईनी. वय वर्षे पंचाहत्तरी पार! असा हा लहान थोरांचा उत्साह!! आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहीकडे!

काही नातेवाईकांनी, काही मैत्रिणींनी तिकडेच सौ. देवश्रीची ओटी भरली.

हळदीकुंकू अत्तर, गजरे देऊन जेवणाचे आवाहन करण्यात आले.

अहो जेवण काय; हॉटेलचेच साधारणपणे थोड्याफार फरकाने नेहमीचेच; पण प्रसंगानुरूप यालाही एक विशेष आयाम जोडण्यात आला. या आगळ्यावेगळ्या देखण्या कार्यक्रमावर कळसही चढला. आपले परभांचे ह्या फुलांच्या वेळी केले जाणारे पक्वान - गोड शिरे व तांदळाची शेव हे ह्या खास भोजनात प्रामुख्याने मिरवीत होते. अर्थातच हॉटेलवाल्यांना शिऱ्याची रेसीपी सौ. सुरेखाने करून तर दाखवलीच पण यावर न थांबता त्यांना खायला देऊन खऱ्या चवीची ओळख करून दिली. पै केटरर्सनी शेव करून दिली.

उत्कृष्ट नियोजन असलेल्या या समारंभाची सांगता सौ. देवश्रीला अनेकानेक शुभेच्छा व आशीर्वाद देऊन तसेच निषाद परज, काजल, बंसी, सुरेखा या सर्वांचे अभिनंदन करून झाली. पाहुणे व यजमान सर्वांच्याच चेहऱ्यावर आगळेच समाधान दिसत होते.

आणखी एक दिवस विलक्षण स्मरणीय झाला. असा हा समृद्ध अनुभव.

*


पाठारे प्रभु सोशल समाज सादर करीत आहे
क्षितिज जयकर आयोजित



गुंतता हृदय हे
सुमधुर जुन्या मराठी गीतांचा कार्यक्रम
नाट्यगीत, भावगीत, चित्रगीत, अभंग
संगीत संयोजन: आनंद सहस्त्रबुध्दे
गायक कलाकार: मंदार आपटे, श्रीरंग भावे, माधुरी करमरकर, अर्चना गोरे
सुसंवादिनी: स्मिता गवाणकर
ध्वनि: नितिश फणसे
स्थळ: पाठारे प्रभु सोसायटी हॉल, १२वा रस्ता गायत्री देवी मंदिरा शेजारी, खार (प), मुंबई - ४०० ०५२.
शनिवार दिनांक २५ नोव्हेंबर, २०१७ सायंकाळी ठीक ५.०० वाजता.
काही जागा राखीव




## पत्र-प्रतिक्रिया

संपादक प्रभूतरुण ,

ऑगस्टचा अंक हाती पडला.प्रथम संपादकीय वाचलं आणि मन सुन्न झालं. दिलीप पेंडसे यांच्या विषयीची बातमी वर्तमानपत्रात वाचली होती.पण आपल्या 'पुत्रशोक' या लेखाने ही शोकांतिका पुन्हा सामोरी आली.माणूस स्वकर्तृत्वाने मोठा होतो, यशस्वी होतो. गुरुजनांच्या मार्गदर्शनाने,संस्काराने यशाच्या शिड्या चढत जातो.मग असं अचानक काय व्हावं की एखाद्या काळसर्पाच्या तोंडी जाऊन माणूस असा रसातळाला पोहचावा? का? असं का व्हावं? खरं काय खोटं काय? विचारांचा भुंगा मन कुरतडत जातो.आमच्या मनीची व्यथा.आपण त्याला वाट करून दिली.अत्यंत भावपूर्ण लेख लिहून आपण आपलं मन मोकळं केलेत.

धन्यवाद.

-नंदकुमार विजयकर

## हौशी कला मंदिर

हौशी कला मंदिराचा वार्षिक क्लब दिवस बुधवार, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१७ रोजी रंगशारदा येथे डॉ. अनिता सुनील कोठारे यांच्या अध्यक्षतेखाली सायंकाळी ७.३० वाजता साजरा होणार आहे. यावेळी 'नऊ कोटी सत्तावन्न लाख' या नाटकाचा प्रयोग आणि नंतर 'लकी डिप्स' होईल. येणाऱ्या रसिकांसाठी अंधेरीपर्यंत परतीची बसव्यवस्था करण्यात आली आहे.

**'प्रभुतरुणा'चे संस्थापक, संपादक कै. विष्णुपंत क्रिष्णाराव कोठारे, कै. सुहास विष्णुपंत कोठारे आणि कै. विहंग विष्णुराज नायक यांनी दिलेल्या योगदानाने या नारळीपोर्णिमेला आपला 'प्रभुतरुण' ९४ वर्षाचा झाला. सर्व प्रभुज्ञातीयांनी त्याला आपले म्हटले म्हणूनच त्याचे 'वाढता वाढता वाढे' असे रूप आहे. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करते.**

**-संपादक**

## पाठारे प्रभु चॅरिटीज

पा. प्र. चॅरिटीजचे 'न्यूज लेटर' नेहमीप्रमाणे घरोघरी पोहोचले. यातील महत्त्वाची 'न्यूज' म्हणजे श्री. वीरपाल रामराव राणे हे १९५७ ते २०१७ अशा आपल्या साठ वर्षांच्या चॅरिटीजमधील लक्षणीय कारकीर्दीनंतर या संस्थेतून निवृत्त होत आहेत. त्याचे औचित्य राखत हा अंक वीरपाल कर्तृत्वांक झाला आहे. त्यांची कामगिरी, निष्ठा, सेवावृत्ती इथे अधोरेखित झाली आहे. सौ. अमीना यांच्या योगदानाची कृतज्ञ जाणीवही अनेक लेखात आहे. 'प्रभुतरुण', 'प्रभुप्रभात'ची जुनी संपादकीये, सत्कार सोहळ्यांची छायाचित्रे, मानपत्र, श्री. अजित मोरोबा विजयकर, श्री. राजन वामनराव जयकर, श्रीम. नलिनी रामराव तळपदे यांचे खास (कृतज्ञ) लेख आदींनी श्री. वीरपाल यांची 'चॅरिटीज' घडवितानांची कर्तृत्वपताका या 'लेटर'मध्ये झळाळून उठली आहे. एक आगळावेगळा हा दस्तऐवजच आहे चॅरिटीजच्या कारदीर्दीतला. या निमित्ताने पुन्हा एकदा आमचेही ''वंदन त्रिवार पुरुषोत्तमा।''

∗ दि. २५ सप्टेंबर रोजी सोशल समाजाचे राजपुरिया हॉल, विलेपार्ले येथे कनकाई देवीच्या उत्सवात विविध कार्यक्रम होतील. सायंकाळी ५ वाजता सुरू होणाऱ्या या कार्यक्रमास सर्व बंधुभगिनींनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# A GREENER FUTURE

***-Anushry Kothare***
Architect, IGBC AP

We plan our life, set goals and challenges, and identify the steps needed to move forward. Whether it is the competitive corporate world or the popular Big Boss Reality Show, the better adaptive individuals can deal with risks presented by circumstances and have a better chance of surviving and of passing on their favourable traits to subsequent generations. The survivors aren't always the strongest; sometimes or nowadays mostly, they are the smartest and the luckiest.

Today, we all are experiencing the increase in the global temperature. This global change of climate, popularly termed as 'global warming' is predicted to have a large impact on the genetic make-up of generations to come.

What species of today will dominate or become extinct tomorrow?

Unlike any other living being, we human beings, have the intelligence, the consciousness and the collective power, to behave and act outside the natural evolutionary path. We are more likely to survive by working with nature rather than against it.

The extensive construction activity all over the globe, impacts the ecosystems, depletes natural resources and leads to increased carbon dioxide levels. With the main objective to make the earth more sustainable, the Green Movement is gathering momentum worldwide. Many organizations all over the globe, such as the U.S Green Building Council (USGBC), UK Green Building Council, Centre for Science & Environment, Indian Green Building Council (IGBC), etc. have actively developed their checklists. The goal is to help to sustain the environment, without disrupting the natural habitats around it. Even small changes can help to promote a better planet earth and a better place for all to live; not just for humans, but also for the plants and wildlife.

The Indian Green Building Council (IGBC), part of the Confederation of Indian Industry (CII) was formed in the year 2001 with a vision, *"to enable a sustainable built environment for all and facilitate India to be one of the global leaders in the sustainable built environment by 2025".* IGBC offers a wide array of services which include developing new green building rating programmes, certification services and green building training programmes.

I have been a part of Amar Builders, a leading real estate development company in Pune, since 5 years, holding the position of *Manager, Design & Development.* We recently achieved IGBC's LEED India Platinum rating for our new commercial project in Pune. It is a great sense of accomplishment and truly satisfying, as I was actively involved in the green techniques and strategies to achieve the certification for the project. Wherever possible, we work with and follow IGBC guidelines with a sustainable design approach, to provide our clients with an environmental friendly and healthy space. In March 2017, Amar Builders gave me the opportunity to appear for the **"IGBC Accredited Professional Examination"** which I cleared successfully. The IGBC - AP Certification is in a way, my step towards being a part of the green movement. The IGBC - AP certificate allows me to participate in green building projects registered under the various "IGBC Rating Programmes" and apply my passion for sustainable design. Projects achieve a credit point, if one of the participants is IGBC AP.

*"Knowledge is accumulation of information; intelligence is the application of knowledge".* We hear and read about sustainable development, carbon footprint and environmental friendly products. Well, it is time we start applying our knowledge, if we haven't already.

Everyone would agree that making sustainable choices is the correct thing to do. But maybe, most of us don't know where to start and assume that to make a difference we have to do something big. Making sustainable choices is good for the environment and for the pocket too. Doing small things to reduce the waste going to landfills and energy consumption can add up to big things, including savings. Here are some of the small things that one can do and also enjoy the benefits.

- ➻ Buy yourself a reusable coffee mug and water bottle. Eliminate plastic.
- ➻ Keep your laptop/computer on sleep mode, not screen saver. This works better for your laptop/computer and for your electric bill.
- ➻ If you can get there on foot, do it! You are saving money, getting exercise and fresh air and also doing something good for the environment.
- ➻ Encourage solar water heating in the society or community you live in.
- ➻ Segregate dry and wet waste from your kitchen (consciously followed in many households today).
- ➻ Discourage disposable straws. They are unnecessary and just add to the waste.
- ➻ Recycle wherever possible (donate clothes, reuse scrap paper and cardboard boxes, use blank pages of used notebooks for practice sheets).

Just by doing some seemingly small and easy things, we can make a big difference to the future and save some money in the process. A win-win situation!

Thus, with a common mission to create a greener future, let us eliminate negative environmental impact completely through smart, skilful and sensitive ways.

✳

---

(पान ३ कॉलम ४ वरून)

अचानक अनिताला ते सगळं आठवलं... ती अविनाशला म्हणाली, ''आईबाबांना बिचाऱ्यांना कधीच त्यांच्या आवडीनिवडी पुऱ्या करता आल्या नाहीत. आईंना विचारलं तरी म्हणायच्या - ''तुला योग्य वाटेल ते कर.''

''खरंच गं! बाबासुद्धा कोणत्याही बाबतीत स्वत:चं मत सांगत नसत अनिता, त्यांना इकडे आणून आपण चूक नाही नं केली? अविनाशच्या मनात त्या क्षणी थोडी कालवाकालव झाली.

''आपण त्यांना त्यांच्या उतारवयात सोडून द्यायला हवं होतं का? आपणही आता उन्मेषच्या घरी राहणार आहोत. थोड्याफार फरकानं आपलीही तीच परिस्थिती आहे. तेव्हा आईबाबांचं मन आपल्याला कळलंच नव्हतं. पण परिस्थितीच तशी होती की त्यांना आपण एकटे सोडून येऊ शकत नव्हतो.''

''आत्तासुद्धा परिस्थितीचीच मागणी आहे अनिता. आपण आपल्या मुलाकडे राहायला जाणार आहोत.'' अरविंदनं खरी वस्तुस्थितीच मांडली.

''खरंच! मुलाचा उत्कर्ष नी पालकांचं वृद्धत्व कधीच नीटपणे हातात हात घालून नांदू शकत नाहीत? सर्वच एकमेकांना सांभाळण्याचा प्रयत्न करतात. पण तरीही 'आहे मनोहर तरी गमते उदास' ही ओळ प्रत्येकाच्या आयुष्यात कोणत्या तरी टप्प्यावर प्रत्यक्षात अवतरतेच!'' अनिता उद्‌गारली.

''आत्ता आपण मुलांचंही मन ओळखतोय नी आईबाबांचंही मन आठवतोय. पण मुलाला आपलं मन आता कळणारच नाही. प्रत्येकाच्या विचारांचा मनोरा आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या रीतीचं रंगरूप घेऊन उभा राहत असतो. आपण इकडेच राहिलो नी मुलांना नव्या जागेत जा म्हणालो तर ती दुखावली जातील. आपण दोघं तसे बरीच वर्ष आपल्या मर्जीनं जगलो. आता मुलाच्या नी सुनेच्या मर्जीनं वागू...''

या घराच्या उंबरठ्याच्या आत होता त्यांचा भूतकाळ नी उंबरठा ओलांडल्यावर दिसणार होता भविष्यकाळ...

अविनाश व अनिता मनातल्या मनात विचार करीत बसून राहिले. खूप वर्षांपूर्वी वसंतराव नी निर्मलाबाई बसले होते तस्सेच. माहीत नसलेल्या भविष्यातलं माहीत नसलेल्या सोसायटीचं काल्पनिक चित्र रंगवीत...

✳

---

*(माझा संपादकीय लेख 'फ्रेण्डशिप डे'वर आहे. त्याच मैत्रीवरची ही उज्ज्वलताईंची कविता.*

*-संपादक)*

## मैत्रीचं नातं

**सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

सुंदर मैत्रीचं नातं म्हणजे
जणू प्रवाह झुळझुळणारा
पेल्यामधली वादळं, रुसवे
सारं अलगद नेणारा ।।धृ।।

मैत्री नाही मंद झुळूक
तो तर शीतल गार वारा
वाहताना आणतो आधाराचा
मधु गंध सतत भरारा
जीवनाच्या तलखीत जणूं
संजीवनीने सुखावणारा।।१।।

मैत्रीमध्ये नाही मालकी
आहे हक्काचा विश्वास
मैत्रीच्या जाणीवेतून निघतो
दृढ भरवंशाचा नि:श्वास
नाही ओशाळेपण नाही कसले ओझे
हा निर्मळ झरा खळाळणारा।।२।।

मैत्रीमधूनच कधी कधी
फूल उमलते प्रेमाचे
दरवळत राही मैत्री आणि
लाभे शुभबंधन लग्नाचे
मैत्रीच्या केवळ स्पर्शाने
हा रंगफुलोरा फुलणारा।।३।।

मैत्रीची सुरेख भावना
बळ देते जगण्याचे
देते वेगळे दृष्टीकोन या
जगाकडे नीट बघण्याचे
सहवास आगळा मैत्रीचा मग
गमे सुखानुभव देणारा।।४।।

✳

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### आत्याबाई नाव बोला

३०-७-२०१७ देवांश सौरभ प्रधान

### नारळ साखर दिला

२४-०८-१७ श्री. आदित्य अलार्क लक्ष्मण देसाई, कु. आरती सुनील पुरव (आं.ज्ञा.)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०७-८-१७ | श्री. निमई श्रीकृष्ण कीर्तिकर, | वय ५९, | मालाड पूर्व |
| १०-८-१७ | श्री. सुभाष केशवराव कोठारे, | वय ८३, | खार |
| १९-८-१७ | श्रीम. रेणुका वामन कीर्तिकर | वय ८२, | वांद्रे |
| २०-८-१७ | श्रीम. शीला (विलासिनी) भोलानाथ कोठारे, | वय ९६, | मीरारोड |
| २९-८-१७ | श्रीम. राधिका श्रीकृष्ण कीर्तिकर | वय ८२, | मालाड |
| २९-९-१७ | श्रीम. रेणुका वामन कीर्तिकर | वय ८२, | वांद्रे |
| ०१-९-१७ | श्री. सुजीत यशवंत कीर्तिकर | वय ७३, | खार |
| ०३-९-१७ | श्रीम. सुनीता नंदकुमार राणे | वय ८१, | पुणे |

## प्रभुतरुणास देणगी

* श्री. किशोर जयकर यांजकडून रु. ७०००/- आभार.
* सौ. समीरा प्रशांत नवलकर यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-
* श्री. प्रताप वेलकर यांजकडून नातसुनेच्या यशाप्रीत्यर्थ रु. १००/-

सर्व देणगीदारांचे आभार.

## अभिनंदन

* सौ. स्वप्ना विजयकर यांनी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या वर्धापनदिनी देणगी देऊन वाचन संस्कृतीला प्रोत्साहन दिले.
* 'मुंबईची मुलगी' या रेडियोवरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणारी आता 'ठाण्याची मुलगी' ठरली आहे. झालं असं, उर्मिन विजयकर यांनी ठाणे स्टेशनला जाण्यासाठी पाचपाखाडीला रिक्षा घेतली. मात्र त्या रिक्षा चालकाने स्टेशनपर्यंत सोडलेच नाही. सध्या ठाण्याच्या रिक्षा चालकांचा बेदरकारपणा, मुजोरी 'लोकसत्ता'-च्या 'ठाणे वृत्तान्त' मध्ये सतत येत आहे. पण 'ठाण्याची मुलगी' जबरदस्तच. तिने पैसे देण्यास नकार दिला; तर रिक्षावाल्याने शिवीगाळ केली. लगेच उर्मिनने १०० नंबरवर फोन करून पोलीस बोलावले. पण तोपर्यंत तो रिक्षावाला थांबतोय कशाला? गेला पळून - पण उर्मिनचे प्रसंगावधान इतके की तिने मोबाईलवर त्याचा फोटो घेतला. फेसबुकवरून हाकारे घातले. शेवटी पाच दिवसांनी पोलिसांना तो सापडलाच. त्याने नौपाड्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकासमोर उर्मिनची माफी मागितली. अन्यायाचा धीटाईने प्रतिकार केल्याबद्दल उर्मिनचे अभिनंदन.
* श्री. अलोक विनोद प्रधान हे 'रॉश' कंपनीत 'चीफ एक्झिक्यूटीव्ह' पदावर सिंगापूर येथे रुजू झाले. त्यांच्या अखत्यारीत तीन देशांचे प्रशासन आहे. अभिनंदन.
* श्री. प्रताप वेलकर यांची नातसून सौ. भक्ती धनंजय अजिंक्य, सिडनी, ऑस्ट्रेलिया येथून 'चार्टर्ड फायनान्शियल ॲनेलिस्ट' परीक्षा उत्तमरित्या उत्तीर्ण झाल्या. अभिनंदन.
* डॉ. सौ. सुमन नवलकरांच्या नि:शब्द कादंबरीला भुसावळचा केशवराव नरखेडे पुरस्कार मिळाला. अभिनंदन.

## पाठारे प्रभु सोशल समाज आणि हौशी कला मंदिर

पाठारे प्रभु सोशल समाज आणि हौशी कला मंदिर या दोन संस्थांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक १९ नोव्हेंबर २०१७ रोजी 'टेनिस बॉल बॉक्स क्रिकेट टूर्नामेंट' आयोजित करण्यात आली आहे. विलिंग्डन क्रिसेन्ट ग्राऊंड, सांताक्रूझ (प.) (मिलन सबवेजवळ) येथे या टूर्नामेन्टस होतील. 'पाठारे प्रभु क्रिकेटर्स' या संस्थेनेही या टूर्नामेंट प्रयोजित केल्या आहेत. 'पाठारे प्रभु क्रिकेटर्स'चे संस्थापक कै. पी. के. राव यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने 'पा. प्र. क्रिकेटर्स' या संस्थेने हे सहकार्य दिले आहे. ह्या टूर्नामेन्टस् पुरुष आणि महिला यांना खुल्या आहेत. ज्यांना यात सहभागी व्हायचे असेल त्यांनी कृपया पुढील व्यक्तींशी संपर्क साधावा.
सौ. नीता सेंजित ९८२०१६६६२८
श्री. अतुल जयकर ९९२०१४२४०२
श्री. जयंत कीर्तिकर ९८६७९५८५३५
श्री. रोहिल जयकर ९८१९०७००८९

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ६ ऑगस्ट २०१७ रोजी दुपारी ४ वाजता पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्र, खार (प.) येथे समाजाच्या अध्यक्षा सौ. नीता सेंजित यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभासदांची उपस्थिती बऱ्यापैकी होती.

सभा संपल्यानंतर काही स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात खालील विजेत्यांना पारितोषिके मिळाली.

स्मरणशक्ती स्पर्धा : १ ले बक्षिस विभागून सौ. रॉनिका विजयकर, सौ. रजनी कोठारे, श्रीमती सुरुपा राणे - देवरुखकर २ रे बक्षिस - सौ. मिनल जयकर, ३ रे बक्षिस - सौ. रेखा देसाई

विषय : संगीत स्पर्धा (महिलांसाठी) सुमन कल्याणपूर यांनी गायलेले मराठी गीत. १ ले बक्षिस श्रीमती क्षमा कोठारे, २ रे बक्षिस सौ. रॉनिका विजयकर, ३ रे बक्षिस - श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर

मुलींसाठी (बडबडगीत) कु. आदिती आशिष व्यवहारकर - समाजाचे बक्षिस नृत्यस्पर्धा - रेकॉर्ड डान्स (महिलांसाठी)

१ ले बक्षिस - सौ. मीना धराधर आंबवणे, २ रे बक्षिस श्रीमती सुरूपा राणे देवरुखकर

(मुलींसाठी) - कु. आदिती आशिष व्यवहारकर - समाज प्राईज्

उत्कृष्ट नृत्याविष्कार - कु. आदिती व्यवहारकर

उत्कृष्ट नृत्यदिग्दर्शक - सौ. शिवानी देवरुखकर

पाठारे प्रभु महिला समाजातर्फे बुधवार दि. ११ ऑक्टोबर २०१७ रोजी सायंकाळी ५ वाजता समाजाच्या शिवण वर्गात ठाकुरद्वार येथे दिवाळी निमित्त गरजू भगिनींना दिवाळी भेट दरवर्षीप्रमाणे देण्यात येईल. तरी गरजू भगिनींनी आपले अर्ज ३० सप्टेंबर २०१७ पर्यंत संयुक्त चिटणीस सौ. रश्मा विजयकर, १९ सेठ ब्लॉक्स, नौरोजी स्ट्रीट, ठाकुरद्वार, मुंबई ४००००२. टे. नं. ९८२०९८१८८२ येथे आणून द्यावेत.

महिला समाजाची २०१८ साली जानेवारी महिन्यात राहण्याची सहल रण महोत्सव कच्छ, भुज, मांडवी येथे नेण्यात येईल. शुल्क प्रत्येकी रु. १६,०००/- आकारण्यात येईल इच्छुकांनी नावे नोंदवून रु. ८,०००/- चा पहिला हप्ता रविवार दि. १७ सप्टेंबर २०१७ पर्यंत भरावा. अधिक चौकशीसाठी सौ. बिंबा नायक (९८३३१२१८८४) यांच्याशी संपर्क साधावा.

## परीक्षेतील सुयश

**दहावी - आय.सी. एस. ई.**
श्री. वेदांत नरेंद्र धैर्यवान ९२ टक्के
**बी. ए. (पोलिटिकल सायन्स)**
कु. अनुषा कोठारे
**बी. टेक. (एस. एन. डी. टी. विद्यापीठ)**
कु. संजना नितीन धराधर
**आय.सी.एस.सी.**
श्री. अमर आशुतोष नवलकर ८६.५ टक्के
कु. विदिशा प्रशांत नवलकर ९६.७ टक्के
**बी.एस्सी. (आयटी, मुंबई विद्यापीठ)**
श्री. प्रजेश प्रसाद तळपदे
बी ग्रेड

आमचे विश्वस्त श्री. गौरांग किर्तीकर यांचे बंधू श्री. निमई यांचे अल्पवयात दु:खद निधन झाले. पाठोपाठ त्यांच्या मातोश्रीही गेल्या. त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.

- संपादक

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.
संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67